आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

९ एप्रिल २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणूकीच्या दूसऱ्या टप्प्यासाठी १३ राज्यांमधल्या ८८ मतदारसंघात एकूण बाराशे दहा उमेदवार रिंगणात /महाराष्ट्रात ८ जागांसाठी २०४ उमेदवार मैदानात

- महाराष्ट्रात मविआचं जागावाटप जाहीर/ कॉंग्रेसला १७, राष्ट्रवादी पवार गटाला १० तर शिवसेना ठाकरे गटाला २१ जागा

- चैत्री नवरात्र आणि गुढीपाडव्याच्या सणाचा सर्वत्र उत्साह

**आणि**

- शेअर बाजारात तेजी/ सेन्सेक्सची ७५ हजारावर झेप/ निफ्टीही नव्या उच्चांकावर

**<><><><><><>**

लोकसभा निवडणूकीच्या दूसऱ्या टप्प्यासाठी १३ राज्यांमधल्या ८८ मतदारसंघात एकूण बाराशे दहा उमेदवार रिंगणात असल्याचं काल अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी स्पष्ट झाल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. असून एकूण ८८ मतदारसंघात २६ एप्रिल ला मतदान होणार आहे. दुसऱ्या टप्प्यासाठी एकूण २ हजार ६३३ अर्ज आले होते. त्यातील १ हजार ४२८ अर्ज बाद झाले. केरळमधून सर्वाधिक ५०० उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत. त्रिपुरामधील एक मतदारसंघात सर्वात कमी १४ अर्ज आले असून महाराष्ट्रातल्या

नांदेड मतदारसंघात सर्वाधिक ९२ अर्ज आले आहेत. या टप्प्यासाठीचं मतदान २६ एप्रिलला होणार आहे.

या टप्प्यात महाराष्ट्रातल्या ८ लोकसभा मतदारसंघांतील एकंदर ९५ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. त्यामुळे आता २०४ उमेदवार रिंगणात आहे. अमरावतीमध्ये ३७, परभणीत ३४, हिंगोलीत ३३, वर्ध्यात २४, नांदेडमधे २३, बुलडाण्यात २१, यवतमाळ-वाशिममध्ये १७ आणि अकोल्यात १५ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

**<><><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी महाराष्ट्रात काँग्रेस १७ जागा लढवणार असून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट १० तर शिवसेना उद्धव ठाकरे गट २१ मतदारंघात उमेदवार उभे करणार आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपाची अंतिम घोषणा आज मुंबईत शिवालय इथं करताना शिवसेना नेते संजय राऊत यांनी ही माहिती दिली. मुंबईत एकूण ६ जागांपैकी ४ जागांवर शिवसेना तर २ जागांवर काँग्रेस लढणार आहे. या बरोबरच काँग्रेस नंदुरबार, धुळे, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा गोंदिया, गडचिरोली - चिमूर, चंद्रपूर, नांदेड, जालना, पुणे, लातूर, सोलापूर, कोल्हापुर, रामटेक आणि मुंबई उत्तर आणि उत्तर मध्य या मतदार संघातून लढणार आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, बारामती, शिरुर, सातारा, भिंवडी, दिंडोरी, माढा, रावेर, वर्धा, अहमदनगर दक्षिण आणि बीड या जागांवर लढणार आहे. शिवसेना मुंबईच्या चार जागांबरोबरच जळगाव, परभणी, नाशिक, पालघर, कल्याण, ठाणे, रायगड, मावळ, धाराशिव, रत्नागिरी, बुलडाणा, हातकणंगले, संभाजी नगर, शिर्डी, सांगली, हिंगोली, यवतमाळ वाशिम आणि मुंबई दक्षिण मध्य, उत्तर पश्चिम, दक्षिण मध्य, आणि ईशान्य मुंबई, या मतदार संघात

लढणार आहे. सर्व घटक पक्ष एकदिलानं लढून विजय मिळवतील असा विश्वास यावेळी सर्वच पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केला. यावेळी शरद पवार, उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील उपस्थित होते.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधील निवडणूक निर्भय वातावरणात व्हावी यासाठी निवडणूक आयोगानं केंद्रीय गृहमंत्रालयाला केंद्रीय राखीव सशस्त्र दलाच्या १०० अधिक तुकड्या तैनात करण्याचे निर्देश दिले आहेत. सीआरपीएफ च्या ५५ आणि सीमा सुरक्षा दलाच्या ४५ तुकड्या पश्चिम बंगालमध्ये तैनात केल्या जाणार आहेत. १५ एप्रिलपर्यंत या तुकड्या तैनात करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

दिल्लीतल्या मद्य धोरण घोटाळ्याशी संबंधीत आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात भारत राष्ट्र समितीच्या नेत्या के कविता यांची न्यायालयीन कोठडी २३ एप्रिल २०२४पर्यंत वाढवली गेली आहे. याप्रकरणी दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयात झालेल्या सुनावणीत काल न्यायालयानं के कविता यांचा अंतरिम जामीन नाकारला आणि त्यांची न्यायालयीन कोठडी नाकारली. के कविता या दिल्लीच्या सत्ताधारी आप पक्षाला मद्य परवान्यांच्या बदल्या लाच देण्याचा आरोप असलेल्या दक्षिण भारतातल्या समुहाशी संबंधित असल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. याप्रकरणी त्यांना १५ मार्च रोजी हैदराबाद इथं अटक केली होती.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा

'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण नांदेड लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><><>**

चैत्र प्रतिपदेला नवीन वर्षाचं स्वागत करणारे विविध सण उत्सव आज देशभरात साजरे करण्यात येत आहेत. जम्मू काश्मीर मधे नवरेह निमित्त शरिका देवीचा उत्साह साजरा होत आहे. खीरभवानी, टिक्कर, तुलमुला या ठिकाणी देवी मंदिरांमधे भाविकांनी गर्दी केली आहे. चैत्री नवरात्राचा प्रारंभ आज होत असून देशाच्या उत्तर भागात पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांमधे सणांचा उत्साह आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी देशवासीयांना गुढीपाडवा, चेती चांद, नवरेह, युगादि आणि साजिबू चेईराओबा च्या शुभेच्छा दिल्या आहेत. देशाच्या विविध भागात विविध नावांनी साजरा होणारा हा सण उन्हाळ्याच्या आरंभ म्हणून देशाच्या विविध भागात साजरा होत असून या सणातून शांती, सद्भभावना आणि सहिष्णूतेचा संदेश मिळत असतो असंही त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. हे नवीन वर्ष प्रत्येकाच्या आयुष्यात सुख समृद्धी आणि चांगले आरोग्य घेऊन येवो, अशा शुभेच्छा उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी दिल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे की, हा सण सुख समृद्धी, सौभाग्य आणि चांगले आरोग्य घेऊन येवो, असंही त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

महाराष्ट्रात गुढीपाडवा. गुढीपाडवा म्हणजेच शाले वाहन शके १९४६ चा नववर्ष प्रारंभ दिन ऐकूया वृत्तांत..

**<u>व्हाईस कास्ट…</u>**

*आज चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात मराठी नववर्षाचा पहिला दिवस आणि साडेतीन मुहुर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या गुढी पाडव्याचा सण. गुढीपाडव्याचा हा सण आज राज्यभरात उत्साहात साजरा केला जातो आहे. या सणानिमीत्त राज्यातली सर्वच शहरं आणि ग्रामीण भागात घरोघरी उंच गुढी उभारल्याचं चित्र दिसतं आहे. उंच काठीला कडूनिंबाची डहाळी, त्याला गुंडाळलेलं रेशमी वस्त्र , फुलांचा हार आणि साखरेच्या गाठ्या आणि सर्वात वर तांब्यांचा किंवा इतर धातुचा कलश अशा सजलेल्या उंच गुढ्या जागोजागी दिसत आहेत.*

*गुढीपाडव्यानिमीत्त राज्यात अनेक ठिकाणी स्वागतयात्रा, शोभायात्रा आणि मिरवणुकांचं आयोजनही केलं गेलं. ठाणे तसंच मुंबईतल्या गिरगाव, दादर, बोरिवलीसह अनेक ठिकाणी शोभायात्रा काढून मराठी नववर्षाचं स्वागत केलं गेलं. ठाण्यातल्या यात्रेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहभागी झाले होते. धुळ्यात काढलेल्या शोभायात्रेतून मतदारजागृती केली गेली.*

**<><><><><><>**

शेअर बाजारात आज खरेदीचा उत्साह दिसून येत आहे. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज बाजार सुरु झआल्यानंतर थोड्य़ाच वेळात ३८१ अंकांची झेप घेऊन ७५ हजाराची विक्रमी पातळी ओलांडून गेला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी देखील ९९ अंकांनी वधारुन २२ हजार ७६५च्या विक्रमी

पातळीवर पोहोचला. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागांची खरेदी जास्त झाल्याचं दिसून येत आहे.

**<><><><><><>**

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात झालेल्या दोन वेगवेगळ्या बॉम्बस्फोटांमधे एका पोलिसासह तीन जण ठार झाले, तर २० जण जखमी झाले आहेत. काल संध्याकाळी क्वेटा जिल्ह्यात कुचलक इथल्या मशिदीत एक स्फोट झाला. यात एका पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला, तर १५ जण जखमी झाल्याची माहिती तिथल्या अधिकाऱ्यांनी दिली.

तर दुसरा स्फोट खुजदार शहरातल्या बाजारपेठेत झाला. यात दोन जण ठार झाले तर पाच जण जखमी झाले. ईदनिमीत्त खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी असताना हा स्फोट झाल्याचं तिथल्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. अद्याप कोणत्याही संघटनेनं या घटनांची जबाबदारी स्वीकारलेली नाही.

**//<><><><><><>//**